गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २५८ वा ● गुरुवार ०८ फेब्रुवारी २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/–

| * Volume 1 | Issue 258 | Date : 08/02/2024 blow :Thursday Page 4 Price 4

## अहंकाराची गाडी दाढीमुळेच खड्ड्यात!

## मुख्यमंत्री शिंदे यांचा उध्दव ठाकरेंना टोला




कणकवली : मोठ्या टेकात ते म्हणतात, दाढीला पकडून, खेचून आणले असते. मुख्यमंत्री असताना अडीच वर्षात ज्यांना वर्षा निवासस्थानाची साधी माडी उतरता आली नाही, ते दाढीपर्यंत कसे पोहोचतील? तुमच्या अहंकाराची गाडी या दाढीनेच खड्ड्यात घातली आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उध्दव ठाकरे यांना फटकारले. धाराशिव जिल्ह्यातील ढोकी येथे आयोजित करण्यात आलेल्या मिशन-४८ शिवसंकल्प – कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पालकमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत, आमदार ज्ञानराज चौगुले, माजी खासदार रवींद्र गायकवाड, मराठवाडा विभागीय अध्यक्ष आनंदराज जाधव, सोलापूर संपर्कप्रमुख शिवाजी सावंत, जिल्हाप्रमुख दत्ता साळुंके, सहसंपर्क प्रमुख अनिल खोचरे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, लातूर जिल्हाप्रमुख शिवाजी माने यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. कणकवली येथील जाहीर सभेत उध्दव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार प्रतिहल्ला केला होता. । पान २ वर

## नेहरू आरक्षणविरोधी..! पंतप्रधानांचे टीकास्त्र, काँग्रेसवरही आरोपांच्या फैरी

नवी दिल्ली : काँग्रेसने सात दशके दलित-आदिवासी आणि ओबीसींना विकासापासून वंचित ठेवले. या समाजांना आरक्षण देण्यास पंडित नेहरूंनी विरोध केला होता. डॉ. आंबेडकरांना 'भारतरत्न' न देता स्वत:ला दिले. आंबेडकर नसते तर दलितांना आरक्षण मिळाले नसते. मागासांच्या विकासात जन्मजात अडथळा आणणारा काँग्रेस आता आम्हाला सामाजिक न्यायाचा धडा शिकवत आहे. स्वत:चा नेता आणि नीतीची गॅरंटी नसलेल्यांनी मोदींच्या गॅरंटीवर प्रश्न उभे करू नये, अशी घणाघाती टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी केली.राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला राज्यसभेत उत्तर देताना मोदींनी पुन्हा काँग्रेस आणि नेहरूंच्या धोरणावर हल्ला केला.



ब्रिटिशकालीन गुलामगिरीच्या मानसिकतेतून काँग्रेसने देशात सत्ता राबवली. त्यामुळेच जगाने भारताकडे कुत्सित नजरेने पाहिले. काँग्रेसचा विचार कालबाह्य आणि नकारात्मक असून वॉरंटी संपलेल्या या पक्षाचे देश कदापि ऐकणार नाही. उलट, मतदार गॅरंटीवर विश्र्वास असलेल्या पक्षाला (भाजप) पुन्हा सत्ता मिळवून देईल', असा विश्र्वास मोदींनी व्यक्त केला.

गरिबीतून मुक्त झालेली २५ कोटी जनता पुन्हा गरिबीत ढकलली जाऊ नये याची दक्षता 'एनडीए' सरकार घेत असून या नवमध्यमवर्गाला आधार देण्याची नितांत गरज आहे. म्हणून ८० कोटी लोकांना मोफत धान्य पुरवले जात आहे. विरोधकांनी कितीही चेष्टा केली तरी ही योजना पुढेही चालू राहील, असे मोदींनी ठणकावले. गेल्या पाच वर्षांत लोकांना पायाभूत सुविधा देण्यासाठी काम केले. पुढील पाच वर्षांमध्ये नवमध्यमवर्गाचा जीवनस्तर वाढवला जाईल, असे सांगत मोदींनी आगामी लोकसभा निवडणुकीत नवमध्यमवर्ग हा प्रचाराचा केंद्रिबदू असल्याचे संकेत दिले. 'विकसित भारत' हा शब्दांचा खेळ नाही. २०४७ पर्यंत हा देश विकसित झालेला असेल. त्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. भारतात पुन्हा सुवर्ण युग अवतरेल आणि या युगाचा इतिहास भविष्यातील पिढ्या सुर्वणाक्षरात लिहून ठेवतील, अशी ग्वाहीही मोदींनी दीड तासांच्या भाषणात दिली.

'मी कुठल्याही आरक्षणाला पाठिंबा देत नाही. सरकारी नोकरीत तर कधीही नाही. आरक्षणामुळे अकुशलता वाढेल, असे पत्र नेहरूंनी तत्कालीन मुख्यमंत्र्यांना लिहून आरक्षणविरोधी भूमिकेचे समर्थन केले होते. दलित, आदिवासी, ओबीसींना नोकरीमध्ये आरक्षण मिळाले तर सरकारी कामकाजाचा स्तर खालावेल, असा दावा नेहरूंनी केला होता, असे मोदी म्हणाले. सरकारी नोकऱ्यांमध्ये वरिष्ठ ओबीसी अधिकारी का नाहीत, असा प्रश्न राहुल गांधींनी केला होता. त्याला सडेतोड उत्तर देत, या प्रश्नाचे मूळ नेहरूंच्या आरक्षणविरोधी धोरणात असल्याची टीका मोदींनी केली. नेहरूंनी या समाजाची सरकारी भरती केली असती तर आत्तापर्यंत ओबीसी वरिष्ठ अधिकारपदावर पोहोचले असते. नेहरूंचे म्हणणे काँग्रेससाठी काळ्या दगडावरील रेघ होती आणि हीच । पान २ वर

## श्रीक्षेत्र पंढरपूर विकासासाठी परिपूर्ण आराखडा करावा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश




मुंबई : श्रीक्षेत्र पंढरपूर येथे वारकरी, भाविकांना मुलभूत पायाभूत सुविधा देण्यासाठी पंढरपुरचा सर्वांगिण विकासासाठी करण्यात येणाऱ्या आराखड्यात दर्शनरांग, मंदिर व परिसराचा विकास, घाट बांधकाम, आपत्ती व्यवस्थापन या सर्व बाबींचा विचार करून परिपूर्ण आराखडा सादर करावा, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिले. पंढरपूर विकास आराखड्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक, नियोजन विभागाचे सचिव सौरव विजय, पर्यटन विभागाच्या सचिव जयश्री भोज यावेळी उपस्थित होते. पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, मंदिर समितीचे अध्यक्ष गहिनीनाथ अवसेकर महाराज आदी दुरदृष्यप्रणालीच्या माध्यमातुन सहभागी झाले होते.

पंढरपुर यात्रा कालावधीत गर्दीचे विकेंद्रीकरण करणे तसेच गर्दीचे व्यवस्थापन करणे अत्यंत जिकिरीचे होते. याकरिता मंजूर विकास योजनेतील प्रदक्षिणा मार्गाकडून मंदिराकडे येणारे आणि प्रदक्षिणा मार्गाकडून नदी पात्राकडे जाणारे विकास योजनेतील रस्ते विकसित झाल्यास पोलीस विभागाला आणि प्रशासनाला एकेरी मार्ग नियोजन, गर्दी विकेंद्रीकरण व व्यवस्थापन करणे शक्य होणार आहे.

आराखड्यामध्ये समाविष्ट कामांबाबत एकसुत्रता व सुसंगतता असावी तसेच तीर्थक्षेत्राला अनुषंगिक कामे गुणवत्तापूर्ण होण्यासाठी देशपातळीवरील वास्तुविशारद, पुरातत्व शास्त्रज्ञ, अभियंत्यांच्या कल्पाना स्विकारून कामे करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम । पान २ वर

## राज्यसभेतील मोदींच्या भाषणावर मल्लिकार्जुन खरगेंचं चोख प्रत्युत्तर



नवी दिल्ली : राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला. त्यांनी पक्षावर देशाचे विभाजन करण्याचा गंभीर आरोप केला. दरम्यान, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान मोदींवर काँग्रेस आणि यूपीएविरोधात चुकीची माहिती पसरवल्याचा आरोप केला आहे. राज्यसभेतील त्यांचे संपूर्ण भाषण केवळ काँग्रेसवर टीका करण्यावर केंद्रीत होते. पण त्यांनी बेरोजगारी, महागाई आणि आर्थिक विषमातेबाबत भाष्य केलं नाही, असं मल्लिकार्जुन खरगे म्हणाले.

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले की, दोन्ही सभागृहातील भाषणात पंतप्रधानांनी काँग्रेसवरच निशाणा साधला. गेली १० वर्षे ते केंद्रात आहेत, पण त्यावर बोलण्याऐवजी त्यांनी काँग्रेस पक्षावर टीका करणेच योग्य मानलं. सभागृहात ते ना जनमताच्या मुद्द्यांवर बोलले ना महागाई आणि बेरोजगारीवर. मी तुम्हाला सांगतो की NDA चा अर्थ "NO DATAA AVAILABLE असा आहे. त्यांच्याकडे ना रोजगार डेटा आहे, ना त्यांच्याकडे आरोग्य सर्वेक्षण डेटा आहे. याचे कारण सरकार सर्व डेटा लपवते आणि खोटे पसरवते. मोदींची हमी फक्त खोटेपणा पसरवण्यासाठी आहे. त्यांनी दोन्ही सभागृहात यूपीए सरकारबद्दल खोटे पसरवले. केंद्र सरकार आणि मोदींवर हल्लाबोल करताना ते म्हणाले की, UPA सरकारच्या काळात बेरोजगारीचा दर २.२ टक्के होता. मात्र त्यांच्या कार्यकाळात तो ४५ वर्षांतील सर्वोच्च पातळीवर पोहोचला आहे. यूपीएच्या १० वर्षांच्या कारकिर्दीत सरासरी जीडीपी । पान २ वर

## भ्रष्टाचार करुन आमच्याकडे या, पक्ष देतो, हीच 'मोदी गॅरंटी' सामनामधून टिका




मुंबई : निवडणूक आयोगाच्या कागदी निर्णयाने शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या अस्तित्वावर फरक पडणार नाही. निवडणूक आयोगाच्या निकालामागे अदृश्य शक्ती नसून महाराष्ट्राच्या स्वाभिमानी मानेवर बसलेली भुताटकी आहे. या भुताटकीस कायमचे गाडावेच लागेल. निवडणूक आयोग हा 'भारता'चा राहिलेला नसून तो मोदी-शहांचा झाला आहे. अशा संविधानिक संस्थांच्या गळ्यात हुकूमशहांचे पट्टे बांधले असतील तर त्यांच्याकडून न्यायाची अपेक्षा कशी करणार? म्हणूनच शरद पवार यांनी प्रचंड मेहनतीने उभा केलेला राष्ट्रवादी पक्ष निवडणूक आयोगाने त्यांच्याच पक्षातील फुटीर आयतोबा अजित पवार यांच्या हवाली केला याचे आश्र्चर्य किंवा खंत वाटण्याचे कारण नाही. याच पद्धतीने हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी निर्माण केलेली शिवसेना 'आयतोबा' एकनाथ शिंधे यांच्या हाती सोपवली गेली. म्हणजे तुम्ही बेइमानी करून, भ्रष्टाचार करून भाजपच्या गोटात या, आम्ही तुमचा 'पक्ष' तुमच्या ताब्यात देतो, हीच 'मोदी गॅरंटी' आहे व लोकशाहीसाठी तो सगळय़ात मोठा धोका आहे, अशी टीका सामना अग्रलेखातून करण्यात आली आहे. शिवसेना एकनाथ शिंदे यांना दिल्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार यांना बहाल करण्यात आला. यावरुन शिवसेना मुखपत्र सामनाच्या अग्रलेखातून मोदी-शाह यांच्यावर टीका केली. तर अजित पवार यांच्यावर टीकेचा बाण सोडलाय.

## राज्यातील ५००० एसटी बस डिझेलऐवजी एलएनजीवर धावणार






मुंबई : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या पाच हजार डिझेल बसेसचे द्रवरूप नैसर्गिक वायू (एलएनजी) या पर्यायी इंधनावर चालणाऱ्या वाहनामध्ये रूपांतर करण्यासाठी किंग गॅस कंपनीसोबत आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला.या एलएनजी इंधन वापरामुळे डिझेल इंधनाच्या वाहनांमुळे होणाऱ्या प्रदुषणामध्ये सुमारे दहा टक्के घट होण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर महामंडळाची दरवर्षी २३४ कोटी रुपयांची बचत होण्यास मदत होणार आहे. प्रवाशांना किफायतशीर आणि पर्यावरणपूरक सेवा मिळणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत परिवहन विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, किंग गॅस कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. कुरेशी यांनी । पान २ वर

## तुळजाभवानी मंदिर संस्थानचा लेखाधिकारी निघाला लाचखोर; ६ लाखांची लाच घेतांना अटक



धाराशिव : छत्रपती संभाजीनगरच्या लाचलुचपत विभागाने धाराशिव जिल्ह्यात मोठी कारवाई केली असून, तुळजाभवानी मंदिर संस्थानचे वित्त व लेखाधिकारी सिद्धेश्र्वर शिंदे याला सुमारे ६ लाख रुपयांची लाच घेताना रंगेहाथ ताब्यात घेतले आहे. मंदिर संस्थानच्या प्रशासकीय कार्यालयातील स्वतःच्या केबिनमध्ये बुधवारी दुपारी तीनच्या सुमारास त्यांना लाच घेतांना पकडण्यात आले आहेत. ३ कोटी ८८ लाखांच्या कामापैकी थकलेले १ कोटी ८८ लाखांचे बिल मंजुरीसाठी शिंदे याने १० लाख रुपये मागितले होते. तडजोडीअंती ६ लाख रुपये घेतांना त्याला ताब्यात घेण्यात आले.

छत्रपती संभाजीनगरच्या लाचलुचपत विभागाने दिलेल्या माहितीनुसार, यातील तक्रारदार हे शासकीय कॅान्ट्रॅक्टर असुन तक्रारदार यांना श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापुर संचलीत श्री तुळजाभवानी सैनिक विदयालयाचे प्रशासकीय इमारतीचे पहिल्या मजल्याचे तसेच प्रवेशद्वार व संरक्षक भिंतीचे बांधकामाचे ०३ करोड ८८ लाखाचे कान्ट्रॅक्ट मिळाले होते. सदर बांधकामाचे ९०% काम पुर्ण झाले आहे. या बांधकामाचे आत्तापर्यंत ०२ करोड पेक्षा जास्त बिल तपासणी करुन मंजुरीसाठी पाठवून मिळवून दिले म्हणुन तसेच उर्वरीत बिल तपासणी करुन मंजुरीसाठी पाठविणेकरीता तसेच अतिरिक्त सुरक्षा रक्कम म्हणुन भरलेली ३४,६०,५७९ रुपये ही परत मिळवून देण्यासाठी शिंदे याने पंचासमक्ष १० लाख रुपयाची मागणी करुन, तडजोडीअंती ६ लाख रुपये । पान २ वर

## हैद्रा शाळेच्या मुख्याध्यापकावर कारवाई करा; मानव सेवा फाऊंडेशनची मागणी




अक्कलकोट/प्रतिनीधी: हैद्रा प्रशालेत२६जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.मात्र त्या राष्ट्रीय कार्यक्रमात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो न ठेवता फक्त राष्ट्रपीता महात्मा गांधी यांचे प्रतिमेचे पुजन करण्यात आला आहे.महापुरुषांचे अपमान व जातीवाद करणाऱ्या मुख्याध्यापक व संस्थाचालकावर तात्काळ कारवाई करण्यात यावी.अशी मागणी मानव सेवा फाऊंडेशनच्या वतिने अक्कलकोट पंचायत समितीचे गट विकास अधिकारी सचिन खुडे यांच्याकडे केले आहे. सविस्तर माहिती अशी की,२६जानेवारी२०२४ रोजी अक्कलकोट तालुक्यातील हैद्रा प्रशालेत प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.परंतु त्या कार्यक्रमात डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी या दोन महापुरुषाचे फोटो पुजा करण्याऐवजी फक्त महात्मा गांधीचे पूजन करण्यात आले आहे.

हैद्रा प्रशालेचे मुख्याध्यापक मल्लिनाथ गंगण्णा मणुरे सांगतो,गेल्या २५ते३० वर्षापासुन२६ जानेवारी व१५ऑगष्ट रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे फोटो ना पुजा केले. ना संविधान प्रास्ताविक वाचन.यापुढे ही पुजा अथवा फोटो लावणार नाही.अशी भाषेत उत्तर दिले आहे. तसेच जो पर्यंत वरुन मला आदेश येत नाही तोपर्यंत मी बाबासाहेबांची प्रतिमा लावणार नाही असे उध्दट व उर्मट भाषेत उत्तर दिले व तुम्हाला कोणाकडे तक्रार करावयाची असेल तेथे तुम्ही तक्रार करा असे धमकीवजा भाषेत उत्तर दिले आहे. याची सर्व व्हिडीओ क्लीप व फोटोज आमच्याकडे उपलब्ध आहे.तरी संबधीत जातीयवादी मुख्याध्यापकाची चौकशी करुन ७ दिवसात मुख्याध्यापकावर कारवाई होऊन त्यांना निलंबीत करण्यात यावे अशी मागणी मानव सेवा फाउंडेशन अध्यक्ष दत्ता कांबळे यांनी केले आहे व याबाबत खुलासा करण्यात यावा. अन्यथा हैद्रा गावचे ग्रामस्थ व दलित समाजातील सर्व बहुजनांना सोबत घेऊन आंदोलन छेडण्यात येईल असा गंभीर इशारा । पान २ वर

## राज्यातील निवासी डॉक्टरांकडून संप माघार

मुंबई : राज्यातील निवासी डॉक्टरांचे वेतन वेळेत मिळत नसल्याने १० तारखेच्या आत पगार तसेच विद्या वेतनमध्ये १० हजार रुपये वाढ करण्यासाठी येणाऱ्या मंत्रिमंडळ बैठक घेण्यात येईल, आदी आश्र्वासन सरकारकडून देण्यात आल्यानंतर संप माघार घेण्यात आला आहे. निवासी डॉक्टरांच्या विद्यावेतनात १० हजार रुपयांची भरीव वाढ करण्यासह ठराविक तारखेला नियमित विद्यावेतन, वसतिगृहांची तातडीने दुरुस्ती करणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

नवीन हॉस्टेलच्या संदर्भामध्ये संचालक, आयुक्त यांना निर्णय देण्यात आला आहे. नवीन होस्टेल आणि दुरुस्तीसाठी त्वरित ८० कोटी रुपये दिले आहेत, असेही सरकारकडून स्पष्ट करण्यात आले. यानंतर आम्ही ७ ते १० दिवसांची वाट पाहू. मात्र, त्यानंतर जर । पान २ वर

# संपादकीय

## महाराष्ट्रात बिहारप्रमाणे घटना..

बिहारमध्ये जंगलराज असल्याची हेटाळणी पुरोगामी महाराष्ट्राचा टेंभा मिरवणाऱ्या महाराष्ट्रातील नेत्यांकडून केली जात होती. त्यावेळी ही हेटाळणी काहीअंशी खरीसुध्दा होती. मात्र, अलीकडे ही दोन्ही राज्ये सुधारली. तेथे लोकांमध्ये निर्भयता येऊन कायद्याचे राज्य असल्याचे आता बऱ्यापैकी वाटू लागले आहे. मात्र, स्वत:ला फार प्रगत आणि अन्य राज्यांपेक्षा येथे कायद्याचे राज्य असल्याची फुशारकी मारुन आपल्याच पाठीवर थाप मारुन घेणाऱ्या भाजपच्या नेत्यांना लाज वाटावी अशी घटना त्यांच्याच पक्षाच्या आमदाराने करावी, यापेक्षा दुर्दैव काय म्हणावे. भाजप हा सुसंस्कृत लोकांचा पक्ष असल्याचा लोकांचा समज कल्याणमध्ये आमदार गणपत गायकवाड यांनी खोटा ठरविला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे जिल्ह्यातील कल्याणमधील पोलीस ठाण्यात घडलेल्या गोळीबाराच्या घटनेने येथे गुंडाराज असल्याचे दाखवून दिले. गेल्या अडीच वर्षांत राज्यात झालेल्या सत्तांतरानंतर शिवसेना-भाजपची सत्ता आली. मात्र, या दोन्ही पक्षांच्या स्थानिक नेत्यांमधील शीतयुध्दाचे परिणाम राज्यात ठिकठिकाणी पाहायला मिळत आहेत. जमिनीच्या वादातून तक्रारदारांच्यावतीने पोलीस ठाण्यात मध्यस्थी करण्यास गेलेल्या शिवसेनेचे शहरप्रमुख महेश गायकवाड आणि भाजपचे आमदार गणपत गायकवाड यांच्यामध्ये पोलीस ठाण्यात शाब्दिक चकमक उडाली. त्याचे पर्यवसान हाणामारी आणि तोडफोडीत झाले. आमदार गायकवाड यांनी पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षकांच्या कक्षामध्येच महेश गायकवाड यांच्यावर रिव्हॉल्व्हरमधून गोळ्या झाडल्या. त्यामध्ये महेश आणि त्यांचा दुसरा सहकारी राहुल पाटील हे गंभीर जखमी झाले. मुख्यमंत्र्यांच्या ठाणे जिल्ह्यात पोलीस ठाण्याला गँगस्टरचे स्वरुप आले. गोळीबार कोणी व कशामुळे केला याचे सीसीटीव्ही फुटेज समोर असतानाही उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उच्चस्तरीय चौकशीचे आदेश द्यावे म्हणजे आपल्या पक्षाच्या गुन्हेगार प्रवृत्तीच्या आमदाराला वाचवण्याचा हा प्रयत्न दिसतो. ही घटना विरोधी पक्षाच्या आमदाराकडून झाली असती तर आतापर्यंत भाजपने रान पेटवले असते. आमदार गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक झाली असली तरी भाजपने त्यांची पक्षातून अजूनपर्यंत हकालपट्टी केली नाही. देशात आणि राज्यात येनकेन प्रकारे भाजपची सत्ता राहावी यासाठी कलंकित लोकप्रतिनिधींनाही भाजपकडून आश्रय देणे सुरु आहे.

पान १ वरुन

## श्रीक्षेत्र पंढरपूर विकासासाठी..

विभागाच्या पुणे प्रादेशिक कार्यालयामार्फत संकल्पना स्पर्धा घेण्यात आली होती. त्यात सहभागी झालेल्या सल्लागारांचे सादरीकरण विभागीय आयुक्तांच्या तांत्रिक सल्लागार समिती समोर झाले. आज त्यातील तीन सल्लागारांनी या बैठकीत आराखड्याबाबत सादरीकरण केले.वाराणसी येथील काशी विश्र्वनाथ देवस्थानच्या धर्तीवर पंढरपुर येथे येणाऱ्या भाविकांना आणि वारकऱ्यांना सुविधा देतानाच परिसराचा विकास करण्यासाठीचा आराखडा करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले होते. त्यानुसार प्रस्तावित आराखडा अंतिम करताना वारकरी संप्रदाय, मंदिर समिती, नागरिक, पंढरपुरातील लोकप्रतिनीधी यासर्वांशी चर्चा करून आराखडा करावा, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. जे निवासी, व्यापारी, दुकानदार बाधित होणार आहेत त्यांना योग्य मोबदला देणे व योग्य ते पुनर्वसनाबाबत देखील या बैठकीत चर्चा झाली.

## राज्यातील ५००० एसटी बस

सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, महाव्यवस्थापक ( भांडार व खरेदी) वैभव वाकोडे उपस्थित होते.एकूण ५००० डिझेल वाहनांचे एलएनजी वाहनांमध्ये रुपांतरण हे तीन वर्षामध्ये एकूण ६ टप्यात करण्यात येणार आहे. संपूर्ण पाच हजार बसेसचे रुपांतरण झाल्यानंतर दरवर्षी महामंडळाचे सुमारे २३४ कोटी रुपयांची बचत होण्यास मदत होईल, असे श्री. जैन यांनी सांगितले. राज्यातील ९० आगारांमध्ये एलएनजी इंधन भरण्याची सोय करण्यात येणार आहे.


महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडे डिझेल इंधनावर चालणारी सुमारे १६ हजार प्रवाशी वाहने आहेत. महामंडळाच्या एकूण खर्चापैकी सुमारे ३४ टक्के खर्च डिझेलवर केला जातो. हरित परिवहनाची संकल्पना राबविण्यासाठी डिझेल ऐवजी पर्यायी इंधन वापरण्यासाठी उद्योग विभागाने महाराष्ट्रासाठी एलएनजी या पर्यायी इंधनाचा पुरवठा करण्यासाठी किंग्स् गॅस प्रा.लि. यांच्याबरोबर सामंजस्य करार केला आहे. त्यामध्ये परिवहनासाठी एलएनजीचा वापर व पुरवठा याचा समावेश करण्यात आला आहे. रुपांतरीत झालेल्या वाहनांची देखभाल ही रुपांतरण केलेल्या कंपनी मार्फत करण्यात येणार असून त्याचा देखभालीचा खर्च महामंडळातर्फे करण्यात येणार आहे.

## हैद्रा शाळेच्या मुख्याध्यापकावर

देण्यात आला आहे.शासनाच्या आदेशानुसार प्रजासत्ताक दिनानिमित्त संविधान प्रास्ताविक वाचन करणे बंधनकारक असताना सदर शाळेत वाचन केले नाही त्यामुळे शाळेची मान्यता रद्द करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे त्यावेळी संस्थेचे अध्यक्ष दत्ता कांबळे, युवा नेते आकाश माने, गोगाव उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, आरपीआय तालुका उपाध्यक्ष अंबादास गायकवाड, भोसगे आरपीआय शाखाध्यक्ष मलकांना सोनकांबळे, सलगर ग्रामपंचायत सदस्य व युवा नेते परशुराम बगळे, सामाजिक कार्यकर्ते शंकर बनसोडे, सरपंच कांट्टेहल्ली अनिल येडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# निवडणूक घेण्याचा उद्देश काय?

लोकसभा निवडणुकी सोबतच अनेक राज्यात विधानसभा निवडणुक सुद्धा आहे. निवडणूक हि लोकशाही मध्ये अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असुन लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी निवडणूक ही पारदर्शक, निष्पक्ष आणि निर्भिड होणे आवश्यक आहे. नागरिकांचा सर्वोत्तम अधिकार म्हणजे मताधिकारा द्वारा जनतेचे कोणते प्रतिनिधी सभागृहात पाठवायचे आणि कोणते भ्रष्ट, अकार्यक्षम आणि नितीहीन लोकांना दुर सारायचे हे सर्व जनता निवडणुकीच्या माध्यमातून ठरवत असते. जनतेची मते घेऊन निवडणूक जिंकता यावी म्हणून उमेदवारांना आपापल्या मतदार संघात चांगले काम करून जनकल्याणावर भर द्यावा लागतो. जनकल्याण या संकल्पनेत मुलभूत सुविधा सह आरोग्य, शिक्षण, रोजगार, महागाई नियंत्रण, शेतमालाला भाव, महिलांचे प्रश्र्न, मजुरांचे प्रश्र्न असे वेगवेगळे मुद्दे येत असतात. सरकारने जनकल्याचे काम करावे जर सरकार जनकल्याणाचे काम करत नसेल तर लोकप्रतीनीधी मार्फत समस्या सरकार दरबारी मांडल्या जातात आणि लोकप्रतिनिधी मार्फत सरकार कडून समस्या सोडवून घेतल्या जातात. जनता आणि सरकार यांच्या मधला दुवा म्हणजे लोकप्रतिनिधी असतो. लोकप्रतिनिधी किंवा सरकार जनकल्याणाचे काम करत नसेल तर ते काम करण्यासाठी दबाव, काम न केल्यास त्यांच्या कामावर संविधानीक मार्गाने टिका करण्याचा अधिकारही जनतेलाच आहे. लोककल्याणाचे काम होत नसतील तर आंदोलन, निदर्शने आणि सरकारच्या चुकीच्या धोरणाचा निषेध करण्याचाही अधिकार जनतेला आहे. जनता हि लोकशाही मध्ये सर्वश्रेष्ठ असुन जनतेच्या सेवेसाठी सर्व यंत्रणा काम करत असते. मताधिकार हा जेवढा लोकशाही मध्ये महत्त्वाचा घटक आहे तेवढाच अजून एक घटक महत्त्वाचा आहे तो म्हणजे बहूपक्षीय मान्यता. आपल्या देशात बहुपक्षीय लोकशाही आहे. याचे कारण असे की सत्ताधारी पक्षाने जनकल्याणाचे काम केले नाही तर दुसऱ्या पक्षाला सत्तेत जाण्याची संधी जनता देते. दुसऱ्या पक्षाचे जनकल्याणाचे काम केले नाही तर तिसऱ्या पक्षाला जनता सत्तेत जाण्याची संधी निर्माण करून देते. हे लोकशाही चे वैशिष्ट्य आहे. सत्ताधारी पक्षासोबत विरोधी ही पक्षही मजबूत असणे हे लोकशाही जिवंत असण्याचे लक्षण आहे. कारण सत्ताधारी पक्ष सत्तेचा गैरवापर करून जनकल्याणाच्या विरोधात काम करू नये, सरकारने योग्य व पारदर्शक कामे करून जनतेचे प्रश्र्न वेळेत सोडवण्यासाठी व त्यावर लक्ष ठेवून सत्ताधारी पक्षाकडून ते दबाव टाकून करून घेण्यासाठी विरोधी पक्ष मजबूत असणे आवश्यक असतो. सरकार ला प्रभावशाली काम करून जनकल्याण करून जनतेचा विश्र्वास व लोकशाही टिकवायची असेल भ्रष्टाचारी, व्याभिचारी नेत्यांवर वचक बसावा म्हणून स्वायत्त संस्था आहेत. स्वायत्त संस्थेच्या कामामध्ये हस्तक्षेप करण्याचा सरकारला कोणताही अधिकार नाही. स्वायत्त संस्थांनी सरकारच्या दबावाखाली न येता प्रामाणिक काम केले तर देशातील भ्रष्टाचार, व्याभिचार आणि गुन्हेगारी दूर व्हायला वेळ लागत नाही. लोकांचे जिवन सोन्यासारखे बनवणारी लोकशाही धुर्त व विषमता वादी लोकांच्या तावडीत सापडली. आणि जे संविधान कामे लोकशाही व लोककल्याणाचे आहेत ते न होता विशिष्ट वर्गाला श्रीमंत करून, एकाच वर्णाची पुन्हा सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. न्यायालयातील न्यायधीश रस्त्यावर येऊन पत्रकार परिषद घेऊन आम्हाला काम करू दिले जात नाही असे सांगत असतील तर




सरकार किती खालच्या पातळीवर जाऊन लोकशाही नष्ट करायला लागले याची प्रचिती येते. जनकल्याणाचे काम होण्या ऐवजी जनतेला उद्ध्वस्त करण्याचे काम येथे होत आहे. जनता शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधेसह मुलभूत सुविधा मागणी करत असताना सरकार मंदिराचे भावनिक गाजर दाखवून वरिल मुद्यावर पडदा टाकुन मुद्दा च नसलेल्या मुद्याला समोर करत आहे. सरकारशी इमानदार राहून आपला स्वाभिमान राजकीय पक्षाच्या पायावर ठेवणारे प्रसारमाध्यमे श्रद्धेचे व धर्माचे भांडवल करून एकाच वर्णाच्या लोकांची झोळी भरून जनतेला मुर्खात काढत आहेत. धर्म ही वैयक्तिक बाब असुन तिला निवडणूक अजेंडा बनवून सार्वजनिक केले जात असेल तर हे लोकशाही साठी आणि लोकांच्या कल्याणासाठी घातक आहे. जनमताने सरकार निर्माण होत असते परंतु येथे इव्हिएमच्या माध्यमातून जनमत शुन्य करून लोकशाहीची हत्या सुरू आहे. राजकीय पक्षासह जनत आम्हाला इव्हिएम नको म्हणून देशभर करोडोच्या संख्येने रस्त्यावर उतरत आहे. निवडणूक हि जनतेला पाहिजे तशी होणे आवश्यक आहे. पक्षाच्या व सरकारच्या मताने निवडणूक होत नसते. जनता एव्हीएम विरोधात असताना सरकार इव्हिएमद्वारेच निवडणूक घेण्यासाठी आग्रही का असेल? अनेक जाणकार लोकांनी प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून ईव्हीएम घोटाळा उघड केला. जेथे लोकांच्या मताची चोरी करून सरकार येत असेल तेथे लोकांची व लोकशाही ची कामे कशी होतील? निवडणूक कशी घ्यायची हा प्रश्र्न जनतेचा आहे. सरकारने जनमत लक्षात घेऊन कायदा करावा आणि निवडणूक आयोगाने सरकारच्या हस्तक्षेप विरहित पारदर्शक व विश्र्वासार्ह निवडणूक घ्यावी. परंतु येथे लोक निवडणूक आयोगा विरोधात आंदोलन मोर्चे करत असताना इव्हिएम विरोधात जे काही सामाजिक माध्यमांवर लोकांनी सामाईक केले आहे ते काढून टाकण्याचे आदेश देणे म्हणजे अभिव्यक्ती स्वांतत्र्याची गळचेपी करणे होय. अत्यंत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे वाद हा निवडणूक आयोग आणि जनता यांचा असुन सरकार जनतेवर कडक कारवाई करण्याचे आदेश देत असेल तर सरळ सरळ आहे. इव्हिएमच्या माध्यमातून सरकार स्थापन होते. जनतेच्या मताची सरकार स्थापन करायला गरज नाही म्हणून सरकार इव्हिएम विरोधात बोलणाऱ्यावर कारवाई केली जाईल अशी भाषा बोलते. जर जनतेच्या मताची गरज सरकार स्थापनेसाठी लागली असती तर सरकारची जनतेवर कारवाई करा अशी बोलण्याची हिंमतच झाली नसती. सरकार विरोधात बोलणाऱ्यांना धर्मविरोधी म्हणून घोषित केले जाते. जातीय व धार्मिक तेढ निर्माण करून माणसाला अडचणीत टाकले जाते. सरकार विरोधात जास्तच बोलले लिहले तर तुरुंगात टाकले जाते. भ्रष्टाचारी नेत्यांना इडीची धमकी देऊन आपल्या पक्षात घेऊन त्याला भ्रष्टाचार मुक्त करून मंत्री बनवले जाते. जो पक्षात आला नाही त्याच्या वर वेगवेगळ्या माध्यमातून दबाव आणला जातो. जागतिक स्तरावर नाव लौकीक केलेल्या महिला सत्ताधारी खासदारावर लैंगिक शोषणाचा गुन्हा दाखल करतात तेव्हा खासदाराचे निलंबन करून कार्यवाही न करता जागतिक पातळीवरील देशाचे नाव गाजवलेल्या महिलांनाच बदनाम केले जाते. जागतिक पातळीवरील महिलांचे हे हाल असतील तर मनिपूर सारखे प्रकरण कितीतरी होत असतील. विरोधी पक्ष नष्ट करून पैसा, सत्तेची शक्ती या जोरावर विरोधी पक्षातील भ्रष्ट नेत्याची बोली लाऊन त्यांना श्रेष्ठ केले जाते.

विद्यार्थी, शेतकरी, महिला न्यायासाठी रस्त्यावर उतरल्यातर त्यांच्या वरच अन्याय केला जातो. प्रसार माध्यमांना हाताशी धरून प्रसारमाध्यमांना पक्षाचे प्रवक्त्याचे काम दिले जाते. सर्वसामान्य व सरकार विरोधात बोलणाऱ्यांवर देशद्रोहाचे खटले भरले जातात तर देशाची दिशाभूल करणाऱ्यांना, देशाची गुप्त माहिती शत्रु देशाला देणाऱ्या खऱ्या देशद्रोही लोकांना पाठीशी घातले जाते. शिक्षण, रोजगार बंद करून शासकीय मालमत्तेचे खाजगीकरण केले जाते. आणि लोकांना आरक्षणासारख्या मुद्द्यांवर लढवले जाते. खाजगीकरणातुन, जुलमी करांतुन नोकरीभरती कपात करून, शैक्षणिक खर्च कमी करून, विदेशी लोन घेऊन मिळवलेला पैसा खर्च कुठे होतो हे विचारणे गुन्हा ठरत आहे. थोडक्यात देशात नागरिकांच्या मुलभूत हक्कांवर बंधने लादुन त्यांना दोषी ठरवण्यात येत आहे, न्याय हक्का साठी लढणाऱ्यांना नक्षलवादी आणि भ्रष्टाचार केलेल्या नेत्यांनी पक्ष प्रवेश केला तर त्यांना भ्रष्टाचार मुक्त करून जबाबदारी ची पदे दिली जातात. लोकशाही मोडकळीस काढणाऱ्यांना सत्तेत तर तर लोकशाही टिकवण्यासाठी लढा देणाऱ्यांना, इव्हिएमच्या विरोधात आंदोलन करणाऱ्यांना तुरुंगात टाकले जात आहे. इव्हिएम मध्ये घोटाळा करून, लोकशाही ची हत्या करून मोक्याच्या पदावर बसलेल्या लोकांना संरक्षण दिले जाते. धर्माच्या नावाखाली कर्म लपवून धर्माला बदनाम केले जाते. देशातील प्रत्येक क्षेत्रातील नागरिकांना सरकारच्या चुकीच्या धोरणाचा त्रास सहन करावा लागत असुन ही येणाऱ्या निवडणूका पारदर्शक व निष्पक्ष होणार नाही हे लहानातील लहान मुलही बोलायला लागली. इव्हिएम बणवणाऱ्या कंपनीच्या संचालक पदी सत्ताधारी लोकच नियुक्त होत असतील तर लोकांचा इव्हिएम व निवडणुकीवर विश्र्वास कसा निर्माण होईल? जर जनतेच्या मताला डावलून, लोकशाही ची हत्या करून निवडणूक आयोग निवडणूक घेत असेल तर ती निवडणूक घेण्याचा उद्देश तरी काय? अगोदरच कर्जाच्या ओझ्याखाली देश दबलेला आहे आणि इव्हिएमच्या माध्यमातून एकतर्फी निकाल द्यायचा आणि लोकांच्या मताची किंमत शुन्य करायची तर पुन्हा निवडणूक घेण्याच्या नाटकासाठी करोडो रुपये खर्च करण्याची गरजच काय? आज लोकशाही सह लोकांचे हक्क अधिकार धोक्यात आले आहेत याचे एकमेव कारण म्हणजे लोकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान कधी वाचलेच नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधान यांना एकाच धर्माची संपती समजून कायम विरोध करून मनातून तिरस्कार केला म्हणून आज हि परिस्थिती निर्माण झाली आहे. देशाला देशातील लोकांना पुन्हा एकदा सोन्याचे दिवस पाहिजे असतील तर डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधान समजून घेणे गरजेचे आहे. जोपर्यंत संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर समजून घेणार नाही तो पर्यंत नागरिक हक्क अधिकारां बाबत जागृत होणार नाही.

आणि लोकशाही मध्ये राजाच अर्थात जनताच जागृत नसेल तर तेथे लोकशाही ची हत्याच होणार. लोकशाहीचे जतन करण्यासाठी लोकशाही मध्ये नागरिक जागृत पाहिजे. परंतु लोकांना अज्ञानात व जाती धर्मात अडकवून राजकीय झोळी भरण्याच्या नादात लोकशाही धोक्यात आली आहे.

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**मोबा: ९१३०९७९३००**

## तुळजाभवानी मंदिर संस्थानचा ..

स्विकारण्याचे मान्य केले. त्यानुसार बुधवारी रोजी पंचासमक्ष ६ लाख रुपये लाच रक्कम स्विकारताना लाचलुचपत विभागाने शिंदेला ताब्यात घेतले. या प्रकरणी पोलीस स्टेशन तुळजापुर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धाराशिव जिल्ह्यातील तुळजाभवानी मंदिर संस्थान राज्यातील एक मोठं मंदिर संस्थान पैकी एक आहे. रोज हजारो भाविक मंदिरात येत असतात. राज्याचं नाही तर देशभरातील भाविक तुळजाभवानी मंदिराच्या दर्शनासाठी येतात. त्यामुळे मंदिर संस्थानात मोठ्या प्रमाणात देणग्या देखील येतात. मात्र, याच तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वित्त व लेखाधिकारी सिद्धेश्र्वर शिंदे हा लाचखोर निघाल्याने खळबळ उडाली आहे. वि

## नेहरू आरक्षणविरोधी..! पंतप्रधानांचे

काँग्रेसची मोठी चूक होती, असा दावा मोदींनी केला.

काँग्रेसला आंबेडकरांचे सामाजिक न्यायाचे विचार पसंत नाहीत. काँग्रेसने आंबेडकरांच्या योगदानाला कमी लेखण्याचा प्रयत्न केला. त्यांना 'भारतरत्न'ही देण्याची तयारी नव्हती. भाजप सरकारने त्यांना भारतरत्न दिले. काँग्रेसचे माजी पक्षाध्यक्ष सीताराम केसरी अतिमागास जातीतील होते पण, त्यांना काँग्रेसने रस्त्यावर फेकून दिले. देशात पहिल्यांदाच 'एनडीए'ने आदिवासी महिलेला उमेदवार केले. काँग्रेसने त्यालाही विरोध केला, अशा आरोपांच्या फैरी मोदींनी झाडल्या.

काँग्रेसने दलित-आदिवासींना व्यवस्थेपासून वंचित ठेवले. आम्ही दलित-आदिवासींना पक्की घरे दिली. चांगले आयुष्य जगण्याचा अधिकार दिला. याच समाजातील महिलांना उज्ज्वला योजना दिली. दलित-आदिवासींची शिष्यवृत्ती १० वर्षांत दुप्पट झाली. शाळेतील गळती कमी झाली. एकलव्य विद्यालयांची संख्या १२० वरून ४०० वर पोहोचली आहे. आदिवासींची दोन विद्यापीठे झाली आहेत. गेल्या १० वर्षांमध्ये उच्च शिक्षणामध्ये दलितांची संख्या ४४ टक्क्यांनी वाढली, आदिवासींचे ६५ टक्क्यांनी तर ओबीसींचे प्रमाण ४५ टक्क्यांनी वाढले. 'सबका साथ, सबका विकास' ही मोदींची गॅरंटी आहे, असे मोदी म्हणाले.

जम्मू-काश्मीरमध्ये आता ओबीसींनाही आरक्षण

भाजप सरकारने अनुच्छेद ३७० रद्द केल्यावर दलित-आदिवासी-ओबीसींना ७० वर्षांनंतर त्यांचे हक्क मिळाले. तिथे दलित अत्याचारविरोधी कायदा लागू झाला. तिथला वाल्मीकी समाज अतिमागास राहिला पण, त्यांच्या कुटुंबांना जम्मू-काश्मीरमध्ये अधिवासाचा (डोमिसाइल) अधिकार दिला गेला नाही. तिथल्या स्थानिक प्रशासनामध्ये ओबीसी आरक्षणाचे विधेयकही एक दिवसापूर्वी लोकसभेत संमत झाले आहे, असे मोदी म्हणाले.

## राज्यसभेतील मोदींच्या भाषणावर

वाढीचा दर ८.१३ टक्के होता आणि सध्याच्या सरकारच्या कार्यकाळात तो केवळ ५.६ टक्के का आहे? जागतिक बँकेच्या मते, २०११ मध्येच भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला होता. यूपीएच्या कार्यकाळात १४ कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढण्यात आले. पण पंतप्रधान मोदी हे सांगणार नाहीत, कारण ते फक्त भाषणातून खोटे बोलण्याचे काम करतात.

## राज्यातील निवासी डॉक्टरांकडून..

सर्व मागण्या मान्य नाही झाल्या तर पुढची भूमिका स्पष्ट करु, असा इशारा राज्यातील निवासी डॉक्टरांकडून देण्यात आला आहे.

संप मागे घेण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या दालनात सेंट्रल मार्ड संघटनेच्या मागण्यांसंदर्भात बैठक झाली. बैठकीस वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर, तसेच सेंट्रल मार्ड संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न वसतिगृहांच्या तक्रारींसंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, निवासी डॉक्टरांच्या वसतिगृहांची दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने वसतिगृहांच्या दुरुस्तीची कामे तातडीने हाती घ्यावीत. विविध जिल्ह्यांत मंजूर करण्यात आलेल्या वसतिगृहांच्या बांधकामांना गती देण्यात यावी. शासनाने नवीन वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करताना त्याच्या आराखड्यात वसतिगृहाचा समावेश केला आहे. त्यामुळे नवीन महाविद्यालयांमधील डॉक्टरांना पहिल्या दिवसापासूनच चांगल्या दर्जाची वसतिगृहे उपलब्ध होणार आहेत. अस्तित्वातील वसतिगृहांच्या दुरुस्तीसाठीचा निधी वितरित करण्यात आला आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने या कामाला प्राधान्य देऊन तातडीने दुरुस्तीची कामे सुरु करावीत. त्यात कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन झाल्यानंतर आज घेण्यात आलेल्या निर्णयांच्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.राज्यातील निवासी डॉक्टरांच्या वसतिगृहांची तातडीने दुरुस्ती करण्याचे निर्देश देताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, वसतिगृहांच्या दुरुस्तीदरम्यान विद्यार्थ्यांना इतर ठिकाणी राहण्याची व्यवस्था करणे गरजेचे असते. मात्र, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या रुग्णालयांच्या परिसरात पर्यायी मोकळ्या खोल्या मिळण्यात अडचणी येतात. अशा वेळी गरजेच्या ठिकाणी विद्यार्थ्यांना भाड्याने खोल्या घेऊन राहता येण्यासाठी ठराविक भाडे देण्यात यावे. शक्य असेल त्याठिकाणी त्यांना पर्यायी खोल्या उपलब्ध करून देण्यात याव्यात, असे निर्देशही त्यांनी दिले.

## अहंकाराची गाडी दाढीमुळेच..

मिंद्यांची दाढी पकडून आणले नसते का? मात्र जे सडलेले आहेत, तेवढ्यांना जाऊ दिले, अशा शब्दांत ठाकरेंनी मुख्यमंत्र्यांचा समाचार घेतला होता. धाराशिव येथील सभेत मुख्यमंत्र्यांनी तोच धागा पकडत उध्दव ठाकरे यांना शेलक्या शब्दांत प्रतिउत्तर दिले. या दाढीकडे तुमच्या खूप नाड्या आहेत, हे विसरू नका. मला बोलायला भाग पाडू नका, माझा नाद करू नका, मला हलक्यात घेऊ नका. तुम्ही हलक्यात घेतले. मात्र त्यामुळे दोन वर्षांपूर्वी काय घडले? ते सगळ्या जगाने पाहिलेले आहे.

त्यात माझा काहीही स्वार्थ नव्हता, अशी पुष्टीही मुख्यमंत्री शिंदे यांनी बोलताना जोडली. मागील विधानसभा निवडणुकीत हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे विचार सोडून तुम्ही वागलात. त्यामुळे शिवसेना वाचविण्यासाठी आणि महाराष्ट्राच्या भाळी आलेला बेईमानीचा शिक्का पुसण्यासाठी आम्ही धाडसी निर्णय घेतला. स्वतःला मर्द समजता, तर दररोज मर्द आहोत म्हणून सांगत कशाला सुटता? असे ओरडून सांगण्याची वेळ तुमच्यावर का येते? असे खोचक प्रश्र्नही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी उपस्थित केले. तुम्ही कितीही आरोप करा, हा एकनाथ शिंदे कामाने उत्तर देईल. मुख्यमंत्री पदावर बसलो असलो तरी काल, आज आणि उद्याही कार्यकर्ता म्हणूनच काम करीत राहणार आहे. काम करणार्या महायुती सरकारला महाराष्ट्रातील जनता भरभरून आशीर्वाद देत आहे. त्यामुळे आगामी लोकसभेच्या निवडणुकीत ४५ पेक्षा अधिक जागा निवडून आणल्याखेरीज राहणार नाही, असा विश्र्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

## नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांच्या निवास्थानी हळदी-कुंकवाचा कार्यक्रम साजरा

लोहा/शिवहार गालफाडे : मकर संक्रांति पासुन रथसप्तमी पर्यंत सुरु असलेल्या तिळ-गुळ व हळदी-कुंकवाचा कार्यक्रमाचा कार्यक्रम हिंदू संस्कृतिप्रमाणे चालू असतो. त्याचाच भाग म्हणून हळदी-कुंकवामुळे जनसंपर्क व चांगल्या विचाराची देवाण घेवाण होत असते. त्यामधुनच राष्ट्रीय एकात्मता निर्माण होते. भगीनीच्या अंगी असलेले अनेक सुप्तगुण चांगला विचार, बोलण्याच्या देवाण घेवाणी निर्माण होतो. म्हणूनच हळदी-कुंकवाला महत्व असते. सद्या हळदी-कुंकवाचा कार्यक्रम लोहा शहरात अनेक ठिकाणी चालू असून त्याचाच भाग म्हणून लोहा येथील मा. नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांच्या निवास्थानी असाच हळदी-कुंकचा कार्यक्रम पार पडला यामध्ये नांदेड जिल्ह्याचे खा.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या आर्ध्यांगिणी सौ. प्रतिभाताई चिखलीकर व भाजपाच्या महिला मोर्चा प्रदेश उपाध्याक्षा सौ.प्रणिताताई चिखलीकर-देवरे यांनी संबंधित महिलांना हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमा उपस्थित असलेल्या महिलांना मार्गदर्शन केले. यावेळेस मा. नगरसेविका सौ. गोदावरीताई सुर्यवंशी व अनेक महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता.



## पुरंदर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या सभापतीपदी दत्तात्रय भगवान फडतरे यांची बिनविरोध निवड

पुरंदर/प्रतिनिधीः पुणे जिल्ह्यातील आक्रमणांकित व शिक्षकांची अर्थवाहिनी म्हणून संबोधले जाणाऱ्या पुरंदर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या सभापतीपदी श्री दत्तात्रय भगवान फडतरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली अत्यंत शांत संयमी आणि सहकारातील अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख आहे.

याप्रसंगी अनेक शिक्षक बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते पतसंस्थेचा कारभार जास्तीत जास्त पारदर्शक स्वच्छ आणि काटेकोरपणे पार पाडण्याचे नवनिर्वाचित चेअरमन श्री दतात्रय फडतरे यांनी या प्रसंगी सांगितले या निवडीच्या निमित्ताने निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून बागवान मॅडम यांनी काम पाहिले याप्रसंगी पुरंदरचे माजी आमदार श्री अशोक भाऊ माननीय, मा श्री जालिंदर भाऊ कामठे अध्यक्ष पश्रि्चम विभाग बीजेपी., श्री गंगाराम जगदाळे उपाध्यक्ष पुणे जिल्हा बीजेपी, श्री दिगंबर दुर्गाडे अध्यक्ष पीडीसीसी बॅंक, उद्योजक श्री कैलास कामठे आदी मान्यवर उपस्थित होते. श्री अशोक भाऊंनी आपल्या मनोगतात बोलताना शिक्षक हा समाजाचा कणा आसून तो राष्ट्राचा शिल्पकार आहे शिक्षकामुळे मी आमदार पर्यत पर्यंत पोहोचलो तर श्री जालिंदर भाऊंनी शिक्षकामुळे समाज जागृती व नैतिक मूल्य जोपासण्याचे काम होते तर श्री गंगाराम जगदाळे यांनी कोणत्याही प्रश्र्नासाठी मी तुमच्या भावासारखा सदैव पाठीशी राहिल तर श्री दिगंबर दुर्गाडे यांनी शिक्षकांसाठी जिल्हा बॅंकेकडून जी मदत हवी असेल त्यासाठी मी सदैव तत्पर राहिल असे मनोगत व्यक्त केले.



कार्यक्रमाचे नियोजन शिक्षक संघाचे अध्यक्ष श्री तानाजी फडतरे, श्री राजेंद्र जगताप अध्यक्ष पुणे जिल्हा केंद्रप्रमुख संघटना व शिक्षक पतसंस्था संचालक मंडळ यांनी केले

अनेक शिक्षकांनी मनोगते व्यक्त केली, १९३२ साली स्थापन झालेल्या पतसंस्थेच्या यशाची कमान उत्तर उत्तर वाढत जावो अशा शुभेच्छा मावळते सभापती श्री सुधीर मेमाणे व सर्वांनीच व्यक्त केल्या. या प्रसंगी शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष श्री गोरख मेमाणे, श्री संजय जगताप, श्री रोहिदास मेमाणे श्री गणेश लंवाडे माजी सरचिटणीस, श्री जितेंद्र मेमाणे, विद्यमान सरचिटणीस श्री भानुदास कुंभारकर, शिक्षक नेते धनंजय जगताप, विजय गायकवाड, दिपक बडधे, नितीन मेमाणे, शिवदास धुमाळ, किरण जगताप, कालीदास पवार, तानाजी झगडे, अशोक खेंगरे, सोपान जगदाळे, संदेश पराळे, संजय लवांडे, शरद कुंभार, संजय शेंडकर, संभाजी शेंडकर, बाळासाहेब फडतरे, केंद्रप्रमुख संघटनेचे अध्यक्ष श्री सुरेश मोरे तसेच विठ्ठल गुरव बाळासाहेब कोलते, प्रताप मेमाणे, विस्तार अधिकरी श्री अनिल गायकवाड, महिला अध्यक्ष प्रतिभा जगताप, अनिता सणस, छाया कुंजीर, चतुरा राजीवडे तसेच बोपगांवचे सरपंच श्री नंदकुमार फडतरे, श्री दत्तात्रय फडतरे यांच्या कुंटूबातील लहान थोर मंडळी बोपगांव ग्रामस्थ व तालुक्यातील शिक्षक बंधू भागिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## मराठा सेवा संघाच्या जिल्हा कार्यकारणी सदस्यपदी घाडगे



अक्कलकोट/प्रतिनिधीः मराठा सेवा संघाच्या जिल्हा कार्यकारणी सदस्य पदी सामाजिक कार्यकर्ते शिवश्री प्रविण तथा पिंटू घाडगे, सांगवी यांची निवड नुकतीच करण्यात आली. मराठा सेवा संघाचे जिल्हा व शहर कार्यकारणी पदग्रहण समारंभ व स्नेह मेळावा नुकतेच सोलापूर येथे संपन्न झाले. याप्रसंगी सदरची निवड करण्यात आली. निवडीचे पत्र जिल्हाध्यक्ष शिवश्री इंजि. प्रा. डॉ. जी.के.देशमुख यांच्या हस्ते शिवश्री प्रविण तथा पिंटू घाडगे यांना देण्यात आले. यावेळी मराठा सेवा संघाचे जिल्हा, शहर पदाधिकारी व सदस्य बहुसंख्याने उपस्थित होते. त्यांच्या निवडी बद्दल सेवा संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. शिवश्री प्रविण तथा पिंटू घाडगे यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत व अभिनंदन होत आहे.

## लोहा तालुक्यात संत बाळुमामाच्या भंडाऱ्यात विषबाधा

लोहा : लोहा तालुक्यातील कोष्टवाडी परीसरात संत बाळुमामा यांच्या पालखी सोहळ्यात आरतीचा कार्यक्रम झाल्यानंतर भंडारा प्रसादात काल एकादशी असल्यामुळे भाविकांना भगर हा महाप्रसाद करण्यात आला होता

या महाप्रसादात विषबाधा झाल्यामुळे सावरगाव , कोष्टवाडी, हरणवाडी , पेंडु , सादलापुर , सह परीसरात अन्य गावातील व्यक्तींना तो भंडाऱ्याचा महाप्रसाद सेवन केल्याने विषबाधा झाली असुन यामध्ये २ ते २.५० हजार लोकांचा समावेश असुन सदरील पेशन्टला शासकीय रुग्णालय लोहा तसेच खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर एस टी बस सह अन्य खाजगी वाहनांने काही पेशन्टला शासकीय रुग्णालय नांदेड , अहमदपूर येथे दाखल करण्यात आले आहे. सर्वांना उपचार प्रकिया चालु असुन पोलिस निरीक्षक अधिक्षक , नायब तहसीलदार , असंख्य अधिकारी व कर्मचारी यांचे अथक प्रयत्न चालू आहेत. सर्व रूग्णांना उपचार चालू आहे , वाहने पण उपलब्ध आहेत, सरकारी दवाखान्यासह औषध पुरवठा पण उपलब्ध आहे

सध्या शांतता आहे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्र्न नाही अशी माहिती लोहा पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी दिली आहे.

## भिमनगर जिल्हा परिषद कन्नड शाळेत रमाई जयंती साजरी



दुधानी /प्रतिनिधी : माता,त्यागमूर्ती रमाई बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२६ व्या जयंती जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळेत भीमनगर येते मोठया उत्साहात साजरा करण्यात आले. प्रथमता माता रमाई प्रतिमेचे पूजन मान्यवर हस्ते करण्यात आला या कार्यक्रमचे अध्यक्ष शाळा व्यवस्थापान समिती अध्यक्षस्थानी सुरेश झळकी होते

यावेळी विद्यार्थी आणि विद्यार्थीनी आपल्या भाषणतुन मनोगत व्यक्त केले बाबासाहेब यांच्या गाणंवर नृत्य साजर केले शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष बसवराज जन्न, सैदप्पा झळकी, सतलिंग निंबाळ, गोरखनाथ दोडमनी, सैदप्पा झलकी, दत्ता सोनकांबळे, खरडे सर,खाजप्पा लोड्डेन, अर्जुन झळकी, गुरु दोडमनी, शिवपुत्रा गायकवा, दौलप्पा लोड्डन, लक्समण रेऊर, गौतम झळकी, निंगप्पा निंबाळ, सचिन लोड्डन, जयभिम बाळुडगी, या कार्यक्रम चे सूत्रसंचालन मलाप्प कांबळे सर यांनी केल आभार शरणाप्पा म्हेत्रे सर यांनी मानले व भीमनगर मधील नागरिक विद्यार्थी उपस्थिती होते.

## रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत पथनाट्यच्या माध्यमातून महामार्ग पोलिसाकडून जनजागृती



वागदरी/एस.के.गायकवाड : राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वरील नळदुर्ग शहरातील बाजारपेठ व बस स्थानकाजवळ पथनाट्यच्या माध्यमातून वाहनचालकासह नागरिकांना नळदुर्ग महामार्ग पोलीस केंद्राच्यावतीने जनजागृती करण्यात आली. अपर महासंचालक (वा) मुंबई, सुखविंदर, पोलीस अधीक्षक महामार्ग छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र श्रीमती डॉ.अनिता जमादार, विभागाचे पोलीस उप अधीक्षक श्रीकांत डीसले, पोलीस निरीक्षक गणेश गिरी, यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ता सुरक्षा अभियान -२०२४ च्या अनुषंगाने पथनाट्यकार अशितोष नाटकर व त्यांच्या पथकातील विद्यार्थी यांचे सह वाहतूक सुरक्षा नियम व अपघातानंतर जखमींना मदत करणे बाबत पथनाट्याच्या माध्यमातून दाखवून देण्यात आले. अपघातग्रस्त जखमींना मदत करणे याबाबत संदेश देण्यात आला. तसेच छक्क-ख अधिकारी कर्मचारी यांचे समवेत म्बुलन्स बोलावून पथनाट्य कार्यक्रम आयोजित केला व पथनाट्य कार्यक्रमाच्या माध्यमातून स्थानिक नागरिकांना वाहनचालकांना अपघातग्रस्ताना मदत करणे व वाहतूक नियमांचे पालन करणे याबाबत संदेश देण्यात आला. माहिती पत्रके वाटण्यात आली. वाहतूक नियमाचे पालन करणे बाबत पुढील प्रमाणे सूचना देण्यात आल्या.

वाहन चालविताना मोबाईलचा वापर करू नये, वाहनाचे कागदपत्र सोबत ठेवणे, दारू पिऊन वाहन चालू नये, ट्रिपल सीट प्रवास करू नये, मोटर सायकल चालविताना हेल्मेटचा वापर करावा, वेग मर्यादाचे पालन करावे, ओव्हरटेक करताना उजव्या बाजूने वाहन चालवावे, चालक परवाना आवश्यक आहे, मोटर वाहन कायद्याअंतर्गत वाढ झालेल्या दंडाच्या रकमेबाबत समजावून सांगितले, जड वाहन धारकांना सोबत क्लीनर ठेवणे बाबत सूचना दिल्या, घाटातून वाहन चालविताना वेग मर्यादा अति आवश्यक आहे याबाबत गव माहिती दिली, वाहन चालवितांना मोबाईल फोनचा वापर टाळावा, वाहनांवर विशेषतःपाठी मागील बाजू रिफ्लेक्टर लावावे, महामार्गावर धोकादायक परिस्थितीत कोणतेही वाहन थांबवू नये, वाहन चालविताना वेग मर्यादाचे पालन करावे, वाहन चालवताना वाहतूक चिन्हे पाहून त्या सूचना प्रमाणे वाहन चालवावे, चारचाकी वाहन चालवताना चालक तसेच सर्वच प्रवाशांनी सीटबेल्ट वापरावे, आपापल्या परिवारातील लोकांना वरील नियमाचे पालन करण्याबाबत सांगावे, ज्या वाहनांवर प्रलंबित दंड आहेत त्यांनी म.पो.केंद्राशी संपर्क साधून तात्काळ दंड भरून घ्यावेत, याबाबत मार्गदर्शन करुन मृत्युंजय दूत संकल्पनेची सविस्तर माहिती देण्यात आली, मोटर सायकल स्वार तसेच जड वहान चालकांना वाहने चालविताना घेण्याबाबतची काळजी व खबरदारी तसेच स्वतःची व दुसऱ्याची हानी होणार नाही याबाबत सूचना दिल्या आहेत.

यावेळी नळदुर्ग महामार्ग पोलीस केंद्राचे पोलीस उपनिरीक्षक सज्जन वाघमोडे उपस्थित होते.

## केंद्रीय योजनांचा लाभ देण्यासाठी 'मोदी गॅरंटी व्हॅन' सोलापूरात दाखल

### विकसित भारत संकल्प यात्रेचा दुसरा टप्पा सुरु,शहरात ३६ ठिकाणी शिबिराचे आयोजन

सोलापूर/प्रतिनिधीः केंद्र शासनाच्या योजनांचा लाभ देण्यासाठी 'मोदी गॅरंटी व्हॅन' शहरात दाखल झाली असून 'विकसित भारत संकल्प यात्रेच्या दुस-या टप्प्याला तुळजापूर नाका येथून दि.६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सुरुवात करण्यात आली. ही यात्रा शहरातील ३६ ठिकाणी २५ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे, अशी माहिती उपायुक्त मच्छिंद्र घोलप व क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण यांनी दिली.

केंद्र शासनाच्या वतीने राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांना पर्यंत पोहोचावी तसेच त्यांना या योजनांचा प्रत्यक्ष लाभ शिबिरांच्या माध्यमातून व्हावा हा या संकल्प यात्रेचा मुख्य उद्देश आहे. कार्यक्रमाच्या ठिकाणी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने दीनदयाळ अंत्योदय योजना, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी), आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, उज्वला योजना व आधार कार्ड संदर्भात माहिती आणि प्रत्यक्ष लाभ देण्याकरिता शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच ऑडिओ-व्हिडीओच्या माध्यमातून केंद्र शासनाच्या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्यात येत आहे. माननीय पंतप्रधान यांच्यासोबत फोटो काढण्यासाठी सेल्फी बुथ उभा करण्यात आला आहे. शासकीय योजनांची माहिती पुस्तिका, कॅलेंडर जनतेसाठी व्हॅनसोबत उपलब्ध करण्यात आली आहेत.




'विकसित संकल्प यात्रेतील मार्गावरील सकाळ व सांयकाळसाठी पुढीलप्रमाणे शिबिरे होणार आहेत. गुरुवार दि. ०८ फेब्रुवारी २०२४ रोजी ओम गर्जना चौक व मरीआई चौक, दि.०९ फेब्रुवारी २०२४ रोजी बलिदान चौक, व गुरुनानक चौक, दि.१० फेब्रुवारी २०२४ रोजी बुधवार पेठ व सोमवार पेठ, दि. ११ फेब्रुवारी २०२४ रोजी शेळगी गावठाण व गांधी नगर, दि. १२ फेब्रुवारी २०२४ रोजी भवानी पेठ व कन्ना चौक, दि. १३ फेब्रुवारी २०२४ रोजी लक्ष्मी नारायण थियेटर व नीलम नगर, दि. १४ फेब्रुवारी २०२४ रोजी दत्त नगर व जुना संतोष नगर, दि. १५ फेब्रुवारी २०२४ रोजी आदित्य नगर व वाय चौक, दि. १६ फेब्रुवारी २०२४ रोजी समाचार चौक व केंद्रीय विद्यालय मोदीखाना, दि. १७ फेब्रुवारी २०२४ बेडर पूल व आदर्श नगर, दि.१८ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रबुध्द भारत चौक व आयोध्या नगर, दि. १९ फेब्रुवारी २०२४ जुना विडी घरकुल व बागवान चौक, दि. २० फेब्रुवारी २०२४ भवानी पेठ व आशा नगर दि. २१ फेब्रुवारी २०२४ मार्केंडेय नगर व भारतमाता नगर, दि. २२ फेब्रुवारी २०२४ राजस्व नगर व मॉडेल कॉलोनी, दि. २३ फेब्रुवारी २०२४ सुंदरम नगर व नेहरू नगर, दि. २४ फेब्रुवारी २०२४ तुळजापूर वेस व कुंभार वेस, दि. २५ फेब्रुवारी २०२४ गेंठ्याल चौक व साईबाबा चौक याठिकाणी कार्यक्रम होणार आहेत.

नागरिकांनी विकसित भारत संकल्प यात्रेत सहभागी होऊन योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन क्षेत्रीय प्रचार सहायक अंबादास यादव यांनी केले आहे. उदघाटन कार्यक्रमासाठी समाजविकास अधिकारी सिद्धराम मेंडगुदले, सुवर्णा पाटील, लक्ष्मीकला वनगा, प्रभाकर डूगम, शिला वाघमारे, जे एम हन्नुरे आणि साईराज राउळ आदी उपस्थित होते.

## बी.एस.पी चे गौतम लक्ष्मण वाघमारे यांचा रिपाइंमध्ये असंख्य कार्यकर्त्यांसह प्रवेश

सोलापूर/प्रतिनिधीः राष्ट्रीय अध्यक्ष संघर्षनायक केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री नामदार रामदासजी आठवले यांच्या नेतृत्वाखालील व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष लोकनेते राजाभाऊ सरवदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत बहुजन समाज पार्टीचे शहर उत्तर विधानसभा उपाध्यक्ष गौतम लक्ष्मण वाघमारे यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह जाहीर प्रवेश लोकनेते आर पी आय चे प्रदेशाध्यक्ष राजभाऊ सरवदे यांच्या हस्ते गौतम वाघमारे यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या सदर प्रसंगी सोलापूर जिल्हा सरचिटणीस-श्यामसुंदर(रवी) गायकवाड,सोलापूर जिल्हा संघटक सचिव-सिध्दार्थ बनसोडे,जिल्हा प्रसिध्दी प्रमुख-जीवन हिप्परगीकर, उत्तर सोलापूर तालुकाध्यक्ष-विठ्ठल वाघमारे,सरचिटणीस-नानासाहेब गायकवाड,संघटन सचिव-दत्ताभाऊ वाघमारे-दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्ष-रामजी गायकवाड,युवक अध्यक्ष-बाबासाहेब जगताप,युवक कार्यध्यक्ष-सागर वाघमारे तसेच कोंडी येथील आकाश वाघमारे परशुराम वाघमारे,केशव वाघमारे,सुरज जगझाप,मनोज वाघमारे,महेश वाघमारे,आकाश साबळे,दिपक शिंदे,सतिश वाघमारे,दत्ता कांबळे,यश व्हनसुरे,मुन्ना शिंदे,बाळु वाघमारे,यांच्या सह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते



# आदर्श फाउंडेशनतर्फे मान्यवरांच्या हस्ते कांबळे यांना पुरस्कार प्रदान

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर सामाजिक न्याय भवन (बार्टी) च्या प्रकल्प अधिकारी प्रणिता कांबळे यांना आदर्श फाउंडेशन संस्थेच्या वतीने आदर्श प्रशासकीय सेवा सन्मान, पर्सन ऑफ द इयर, पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, महिलांनी कौटुंबिक जबाबदारी बरोबरच सर्वच क्षेत्रात भरारी घेतली आहे. महिला सक्षमपणे कर्तबगारी सिद्ध करीत आहेत.समाजाप्रती केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन माझा सन्मान झाला

याविषयी आनंद वाटतो. आदर्श फाउंडेशन संस्था विविध क्षेत्रातील व्यक्तींना प्रोत्साहित करण्याचे काम करीत असून फाउंडेशनचे हे कार्य प्रेरणादायी आहे असे मत व्यक्त करित त्यांनी पुढील कार्यासाठी सहकार्य करण्याचे अभिवचन देऊन, शुभेच्छा दिल्या.

कोल्हापूर येथील राजर्षी शाहू स्मारक सभागृह येथे झालेल्या समारंभात कोल्हापुरी फेटा , सन्मानचिन्ह ,सन्मानपत्र देऊन प्रणिता कांबळे यांचा गौरव करण्यात आला. उद्धव ठाकरे शिवसेना सांगली जिल्हा प्रमुख योजना पाटील (येलूर ) या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.यावेळी मान्यवरांच्या हस्ते यशोगाथा या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले.

या समारंभास शिरोळच्या माजी उपनगराध्यक्षा कमलाबाई शिंदे, राज्य कर निरीक्षक दिपाली लोहार,पश्रि्चम महाराष्ट्र सरपंच संघटना अध्यक्ष प्रदीप माने पाटील,शाहू सहकारी साखर कारखान्याच्या संचालिका



रेखाताई पाटील ,सावर्डे बुद्रुक चे माजी सरपंच प्रताप पाटील , माजी सैनिक फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष संजय माने,ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सुमन भगवानराव साळुंखे , अभिनेते डॉ दगडू माने ,निवेदिता शिंदे,हर्षवर्धन शिंदे,स्नेहल शिंदे, अमरसिंह शिंदे,शिल्पा महात्मे,अश्रि्वनी माळी ,संजय भोसले, संजय काटे यांच्यासह आदर्श फाउंडेशनचे प्रमुख विजय लोहार,कार्यवाह वनिता लोहार आदि मान्यवर उपस्थित होते .प्रा गंगाराम सातपुते यांनी स्वागत केले.अभिनेते श्रीनिवास कळसे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा ज्ञानेश्र्वरी देशपांडे यांनी केले.

## भीमसैनिक आक्रोश मोर्चा प्रचंड यशस्वी केल्यामुळे आंबेडकरीवादी समाजाचे आभार : अजय मुकणार

अक्कलकोट/प्रतिनिधीः डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची गुलबर्गा कोटनूर गावातील प्रतिमेची विटंबना अक्कलकोट तालुक्यात सातत्याने होणारे दलितांचे अत्याचार याविरुद्ध आंबेडकर समाजाच्या वतीने एकत्रित अशा सोमवारी काढलेला मोर्चा प्रचंड यशस्वी झाला असून यात सुमारे चाळीस ते पन्नास हजार पेक्षा जास्त अक्कलकोटच्या आंबेडकरी नागरिकांनी उपस्थिती राहून आपला आक्रोश प्रशासनाच्या विरुद्ध दाखवून दिला आहे ही सर्व जनता फक्त अक्कलकोट तालुक्यातील असून त्यामध्ये सर्वच आंबेडकर पक्ष संघटना कार्यकर्त्यांनी आक्रोश मोर्चात यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतलेली आहे त्या तमाम सर्व समाज बांधवांचे अक्कलकोट समाज समूहाच्या वतीने तेवढे कौतुक करेल तेवढे कमीच आहे ते सर्व आभाराचे पात्र आहेत दलित अत्याचाराच्या विरोधामध्ये ही अशांततेची इशारा असून येणाऱ्या काळात जर बौद्ध समाजावरील अत्याचार थांबला नाही व आंबेडकर समाजाचे कोणतेही प्रश्र्न सुटले नाहीत तर आंबेडकर समाज याच एकतेच्या जोरावर आपल्या न्याय हक्कासाठी सर्वांना त्यांची जागा दाखवून देईल या मोर्चात शहर ग्रामीण भागातून आलेले महिलावर्ग बालक व भीमसैनिक, पुण्याहून आलेल्या सर्व भीमसैनिक मनापासून आभार व्यक्त करतो असे भावना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया शहर अध्यक्ष अजय मुकणार यांनी केले



## सोलापूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना मिळणार आत्मरक्षणाचे प्रशिक्षण

### समग्र शिक्षा अंतर्गत राज्यातील २२ हजार विद्यार्थिनींना आत्मरक्षणाचे धडे देण्यात येणार आहेत.



सोलापूर/प्रतिनिधीः हिंसाचार करणाऱ्या गुन्हेगारांचा सक्षमपणे सामना करण्यासाठी मुली तयार करणे, कोणत्याही प्रकारच्या कठीण परिस्थितीचा खंबीरपणे मुकाबला करण्यासाठी मुलींना पारंगत करणे, त्यांच्यात आत्मविश्र्वास व जागृती विकसित करणे ही काळाची गरज आहे. याच उद्देशाने महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई चे प्रकल्प संचालक श्री. प्रदीप कुमार डांगे यांनी राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा प्रशिक्षण कार्यक्रमाची आखणी केली आहे.सोलापूर जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यात ८१३ शाळांमधील मुलींना जानेवारी ते मार्च अशा ३ महिन्यात प्रशिक्षण देण्यात येत आहे. प्राथमिक शिक्षणाधिकारी श्रीमती तृप्ती अंधारे व माध्यमिक शिक्षणाधिकारी मारुती फडके यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. येणाऱ्या काळात या उपक्रमाचा मुलींना निश्रि्चत फायदा होईल अशी अपेक्षा आहे.

## बहुजन हिताय वसतिगृह म्हणजे मन मेंदू आणि मनगटाचे सक्षमीकरण करण्यातची कार्यशाळा होय : एस.के.गायकवाड



वागदरी/एस.के गायकवाड : महात्मा ज्योतिबा फुले आणि राजर्षी शाहू महाराजांनी या देशात बहुजनांच्या उत्कर्षासाठी शिक्षण आणि वसतिगृहाची चळवळ सुरू केली.त्यांच्या चळवळीला महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून घटनात्मक आधिकार मिळवून दिला.

या महामानवांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून बहुजन हिताय वसतिगृहाची वाटचाल सुरू असून बहुजन हिताय वसतिगृह म्हणजे शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचे मन मेंदू आणि मनगटाचे सक्षमीकरण करण्याची एक कार्यशाळाच आहे.असे गौर उदगार रिपाइं (आठवले)चे जिल्हा सचिव तथा सामाजिक कार्यकर्ते पत्रकार एस.के.गायकवाड यांनी बहुजन हिताय वसतिगृह उमरगा येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना केले.

बहुजन हिताय वसतिगृह गुंजोटी रोड उमरगा येथे तुळजापूर,उमरगा, लोहारा,तालुक्यातील माजी विद्यार्थ्यांच्या पालकांनी या वसतिगृहाला सस्नेह भेट दिली.यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात एस.के.गायकवाड बोलत होते. या याप्रसंगी दहिटणा ता.तुळजापूर येथील आंबेडकरी चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते माजी विद्यार्थ्यचे पालक बलभीम लक्ष्मण सुरवसे यांनी या वसतिगृहास ५० नग स्टीलचे ताट व ग्लास देणगीस्वरुपात भेट दिली.

प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध, महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर व रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमचे प्रास्ताविक वसतिगृहाचे अधिक्षक धम्मचारी प्रज्ञाजीत यांनी केले तर सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन सहशिक्षक वसंत पासेमे यांनी केले. यावेळी दहिटणा ग्रा.प.सदस्य बाबुराव वाघमारे,भिमशाहीर रामचंद्र कांबळे, रिपाइं (आठवले)दहिटणा शाखा प्रमुख, परमेश्र्वर कांबळे,माजी ग्रा.प.सदस्य केरनाथ वाघमारे, युवराज गायकवाड, नागनाथ गायकवाड आष्टा (कासार),एस.एल.मोरे,

क्रांतीविर हरीबा गायकवाड,मातोश्री गंधाराबाई गायकवाड, मेजर जिवन कांबळे, धनपाल गायकवाड,कल्पना कांबळे (कदेर), सोजरबाई बनसोडे, भूमिका सुरवसे जेष्ठ कार्यकर्ते भानुदास बनसोडे सह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बार्टी संस्थेत महामाता रमामाई आंबेडकर यांना विनम्र अभिवादन

पुणे : डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने बार्टीचे मा महासंचालक सुनिल वारे, विभागप्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली त्यागमुर्ती महामाता रमामाई भीमराव आंबेडकर यांची १२७ वी जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. महामाता रमाबाई भीमराव आंबेडकर ,डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस विभागप्रमुख श्रीमती वृषाली शिंदे, रवींद्र कदम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी समतादुत विभागाच्या वतीने डॉ संध्या नारखडे, तेजस्विनी सोनवणे, उषा भिंगारे आणि सुमन मस्के यांनी रमाईचे गित सादर केले.विभागप्रमुख वृषाली शिंदे अभिवादन करतांना म्हणाले की



त्यागमुर्ती महामाता रमामाई या महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाठीशी ढाल बनुन राहिल्या बाबासाहेबांना उच्चशिक्षणासाठी प्रोत्साहन दिले रमाईचा संघर्ष मोठा असुन त्यांच्या त्यागाची आजच्या महिलांनी आठवन ठेऊन त्यांचा आदर्श घ्यावा असे मत व्यक्त केले.

कार्यालय अधिक्षक डॉ संध्या नारखडे, प्रकल्प व्यवस्थापक नितिन सहारे, डॉ संभाजी बिराजे, डॉ अंकुश गायकवाड, वैशाली खांडेकर, रंजनी वाघमारे, यांनी रमाईच्या जयंतीनिमित्त मनोगत व्यक्त करुन त्यांच्या त्यागाला उजाळा दिला. याप्रसंगी कार्यालय अधीक्षक सचिन जगदाळे, सहाय्यक लेखाधिकारी गणेश देशमुख, उल्हास शिंदे , रिपाईचे नेते परशुराम वाडेकर, प्रकल्प व्यवस्थापक महेश गवई, विकास गायकवाड यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन सुनंदा गायकवाड यांनी केले. आभार जागृती गायकवाड यांनी मानले. महामाता रमामाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारक पुणे येथील रमाईच्या पुतळ्यास विभागप्रमुख वृषाली शिंदे, कार्यालय अधीक्षक डॉ संध्या नारखडे, यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महामाता रमामाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारकांचे मुख्य समन्वयक विठल गायकवाड यांच्या हस्ते विभागप्रमुख शिंदे मडम यांना पंचशिलेची शाल, सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी नितिन सहारे, सुनंदा गायकवाड, रामदास लोखंडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## माळशिरस तालुक्यात शेकडो युवकांचा प्रहार मध्ये प्रवेश



पंढरपूर /संतोष मोरे : माळशिरस विश्रामगृह येथे प्रहार जनशक्ती पक्ष शेतकरी संघटनेची बैठक पार पडली या बैठकीत तालुक्यातील शेकडो युवक आणि शेतकरी प्रहार जनशक्ती पक्षात सामील झाले.डॉ,अमित काळे यांची तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली. आमदार बच्चुभाऊ कडू यांच्या आदेशाने प्रदेशाध्यक्ष अनिल भाऊ गावंडे कार्याध्यक्ष बल्लू भाऊ जवंजाल यांच्या मार्गदर्शनात जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ मस्के पाटील यांच्या नेतृत्वात माळशिरस तालुक्यातील प्रहार जनशक्ती पक्ष शेतकरी संघटना पदाधिकारी कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली या बैठकीत माळशिरस तालुक्यातील नामवंत डॉक्टर अमित काळे यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह प्रहार मध्ये प्रवेश केला गेल्या अनेक वर्षापासून दिव्यांग बांधवांना आपल्या हॉस्पिटलला मोफत सेवा देणारे आणि नवरात्रीत सलग नऊ दिवस तालुक्यातील भगिनींची मोफत प्रसूती करणारे डॉक्टर अमित काळे हे बच्चुभाऊंच्या विचाराने प्रेरित होऊन आणि सोलापूर जिल्ह्यातील प्रहार जनशक्ती पक्षाच्या कार्याने प्रभावित होऊन आज आपल्या शेकडो समर्थकांसह प्रहार मध्ये प्रवेश केला.

यावेळी पक्षाचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ मस्के पाटील यांनी त्यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवत त्यांना प्रहार जनशक्ती पक्षाच्या तालुका अध्यक्ष पदाची जबाबदारी दिली त्यांनीही वंदनीय बच्चुभाऊंचा सेवा त्याग समर्पण संघर्ष विचार घराघरात पोहोचवण्याचा यावेळी शब्द दिला.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष मस्के पाटील यांनी तालुक्यातील राजकारण्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्र्न उपस्थित करत गेल्या पंचवीस वर्षापासून तालुक्यात मंत्रिपद असताना सुद्धा कोणताही विकास तालुक्यातील राजकारणांना साध्य करता आला नाही अशी तोफ डागली, प्रहार च्या माध्यमातून तालुक्यातील प्रत्येक वंचित घटकांपर्यंत सेवा पोहोचवण्याचा शब्दही त्यांनी यावेळी दिला.

यावेळी सेवक नगरसेवक आकाश सावंत,राजाभाऊ काळे अनिल राचकर रोहन ठवरे,जिल्हा कार्यकारणी सदस्य नाना काळे चालक-मालक तालुकाध्यक्ष संजय पवल,सोनू ठवरे विकास ठवरे अमोल बुधनवर ज्ञानदेव कांबळे पाटील रंजीत हांडे अण्णा लडकत गणेश वाघमोडे,अमोल वाघमोडे माऊली सरगर संदीप काळे गुरु करचे तुषार ठवरे संदीप जाधव डॉ तानाजी देवकते समीर काळजी राम लोखंडे आबा खरात राजाभाऊ ठवरे अभी लोखंडे प्रथमेश ठवरे सागर फणसे सुरज जाधव अजित भिसे विश्र्वजीत काळे किरण वाघ,पिनू लोंढे तालुक्यातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## धनगर आरक्षण इशारा मेळाव्या संदर्भात घोंगडी बैठका

### मंगरुळ,मोहा,बोर्डा,देवधानोरा,गोविंदपुर,येथे बैठका



कळंब/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यात धनगर आरक्षण अंमलबजावणी करण्याच्या मागणीसाठी दि. ११ फेब्रुवारी रोजी बीड येथे होत असलेल्या ईशारा मेळाव्या संदर्भात चर्चा करण्यासाठी तालुक्यात मंगरुळ,मोहा , बोर्डा,देवधानोरा , गोविंदपुर, येथे बैठका पार पडल्या. महाराष्ट्रभर यशवंत सेनेच्या वतीने सतत वेगवेगळ्या पद्धतीने आंदोलने चालू आहेत याच आंदोलनाच एक भाग म्हणून ११ फेब्रुवारी रोजी सरकारला ईशारा देण्यासाठी बीड येथे ईशारा मेळावा आयोजित करण्यात आला आहे . त्या संदर्भात समाज जागृती साठी कळंब तालुक्यात ठिकठिकाणी घोंगडी बैठका घेण्यात येत आहेत.

या बैठकांना संभाजी हारकर, बंडु लांडगे,संतोष घाटुळे, ज्ञानेश्र्वर लीके, सतीश वैद्य,खेलबा सुडके, यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात ठिकठिकाणी घोंगडी बैठका घेण्यात येत आहेत. या बैठकीला तालुक्यातील धनगर समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता

## कुटीर रुग्णालय बदली करून छत्रपती शिवाजी महाराज उपजिल्हा रुग्णालय करमाळा नाव करावे

### वंचित बहुजन आघाडीची मागणी




करमाळा/प्रतिनिधी : करमाळा तालुका उपजिल्हा रुग्णालय असून सदर रुग्णालया मध्ये तालुक्यातील तसेच आजुबाजुच्या काही तालुक्यातील लोक उपचाराकरिता येत असतात. या रुग्णालयास कुटीर रुग्णालय करमाळा असे संबोधिले जाते. तरी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती १९ फेब्रुवारी रोजी येत असून सदर जयंती निमित्त व करमाळा तसेच आजुबाजूच्या तालुक्यातील तमाम शिवप्रेमी आंबेडकर प्रेमी वंचित बहुजन युवा आघाडी यांची मागणीनुसार सदर रुग्णालयाचे नाव छत्रपती शिवाजी महाराज उपजिल्हा रुग्णालय असे नामकरण करण्यात यावे. सदर नामकरण हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त दि.१९ फेब्रुवारी रोजी च्या आत करण्याचे करावे. या विनंती वजा मागणीला आपणाकडून मान्यता मिळेल व करमाळा शहरातील उपजिल्हा रुग्णालयाचे नामकरण छत्रपती शिवाजी महाराज उपजिल्हा रुग्णालय होईल अशी आशा आहे. तरी आपणांस पुन: श्र्च एकदा विनंती की आपण आपल्या स्तरावरुन नामकरण प्रक्रिया करावी व उपजिल्हा रुग्णालयाचे नामकरण करुन द्यावे जेणेकरुन छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव व इतिहास जनमाणसांत रुजू होईल. असे निवेदनात नमूद केले आहे. निवेदन करमाळा नायब तहसीलदार. काझी भाऊसाहेब यांनी स्विकारले. यावेळी मराठा महासंघाचे ता.अध्यक्ष. सचिन काळे. रा. कोन्ग्रेस चे हणमंत मांढरे. शहर अध्यक्ष. गणेश कांबळे. महासचिव रामभाऊ कांबळे. उपाध्यक्ष. साधू चौथमहाल. ता.संघटक. महावीर पोळ, श्री कमला देवी माळ. राजेंद्र फलफले . चव्हाण. अरुण जैन सिद्धांत वाघमारे. विनोद कुकडे. सूरज कांबळे. आदींनी निवेदनावर सह्या केल्या. पुढे बोलताना जिल्हा अध्यक्ष ह्नसाहेबराव वाघमारे यांनी सांगितले की जर कुटीर चे नाव बदलून छत्रपती शिवाजी महाराज उपजिल्हा रुग्णालय नाव न केल्यास वंचित बहुजन युवा आघाडी च्या वतीने १५ फेब्रुवारी रोजी आंदोलन केले जाईल. असा इशारा देण्यात आला.